## सरकारतर्फे साक्षीदार क. १

शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचे नाव : ग्यानचंद हरी भाट

वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी

राहणार : पिंपरी, पुणे.

**अभियोग पक्षातर्फे—सहाय्यक सरकारी अभियोक्ता गैरहजर—सरतपासणी—न्यायालयामार्फत**

मी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सन १९८९ पासून कार्यरत आहे. मी आरोपी प्रभाकर साळुंखे यांना ओळखत नाही. आम्ही पेट्रोलिंग करीत असताना आरोपीने वाकड परीसरात विदयुत पोलवर दोन बाय तीनचे किडझी क्लासेसचे अनधिकृतपणे जाहीरात फलक लावलेले आढळले. त्याबाबतचा दिनांक ०४/०७/२०१८ रोजी पंचनामा तयार केला होता. मला आता दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **निशाणी क.१३** देण्यात आली आहे. त्या ठिकाणी फलकाचा फोटो काढला होता. तो प्रकरणात दाखल आहे. त्याला **आर्टीकल ए** देण्यात आले आहे. दिनांक २५/०६/२०१८ रोजी आरोपीला नोटीस दिली होती. त्याची झेरॉक्स प्रत प्रकरणात दाखल आहे. ती **आर्टीकल बी** वर आहे. माननीय आयुक्तांचे अधिकार प्रदान केल्याबाबतच्या आदेशाची प्रत प्रकरणात दाखल आहे. ती **निशाणी क.१४ आणि १५** वर आहे. मी आरोपीविरूध्द दिनांक ०४/०७/२०१८ रोजी तक्रार दिली होती. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **निशाणी क.१६** देण्यात आली आहे. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **निशाणी क.१७** देण्यात आली आहे. एफआयआर वर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला

**निशाणी क.१८** देण्यात आली आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे तज्ञ वकील श्री. के. पी. बकाल यांचेमार्फत</u>**

साक्षीदाराला **आर्टीकल बी** वरील नोटीस दाखविण्यात आली. त्यामुळे त्याला **निशाणी क.१९** देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, **निशाणी क.१९** वरील नोटीसीमध्ये तारखेत ओव्हररायटींग झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, विदयुत पोलवर फलक लावण्याकरीता विदयुत विभागाची परवानगी घ्यावी लागते. सन २०१८ मध्ये माझी पदोन्नती झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, **निशाणी क.१४** वरील आदेशात माझे पद मुख्य लिपीक असे लिहीलेले आहे. आमच्या विभागात मुख्य लिपीक यांनाच परवाना निरीक्षक म्हणून काम करण्याचे आदेश आहेत. परंतु त्याबाबतचे लेखी कागदपत्र प्रकरणात दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, फक्त निरीक्षकांनाच गुन्हा दाखल करण्याचे अधिकार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, **निशाणी क.१९** वरील नोटीस मी स्वत: बजावली होती. आमची कर्तव्याची वेळ सकाळी दहा ते सायंकाळी पावणे सहा पर्यंत आहे. आमच्या कर्तव्याच्या वेळेपेक्षा जास्त थांबायचे असल्यास वरीष्ठांची परवानगी घ्यावी लागते. मी एफआयआर कर्तव्याच्या वेळेत दाखल केली आहे. मला फोटो काढणा—या फोटोग्राफरचे नाव सांगता येणार नाही. आम्ही फलक जमा करून घेतले नाही. आम्ही आरोपी हे किडझीचे मालक असल्याबाबत खात्री केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा कार्यालयात बसूनच तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणतेही जाहीरात फलक लावले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत.

दिनांक: १२/१२/२०१८

(माधुरी रा. खनवे)
न्या.दं.प्र.व. (पिं.चिं.म.न.पा.), आकुर्डी, पुणे.

सं.फौ.ख.क.:—०१/२०१८
सरकार—वि—प्रभाकर साळुंखे
निशाणी क.:—१२

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Deposition are same word for word as per original Deposition".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. S. S. Gupte |
| Court Name | :- | Madhuri R. Khanwe<br>(J.M.F.C.) Civil and Criminal Court (P.C.M.C.),<br>Akurdi, Pune. |
| Date | :- | 12/12/2018 |
| Deposition signed by presiding officer on | :- | 12/12/2018 |
| Deposition uploaded on | :- | 12/12/2018 |